<u>नियमित फौ.ख.क्र. ७८/२०२१</u>

<u>नि.क्र.२१</u>

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी.</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

**माझे नांव : मधुकर कुशाबा तळपाडे,**

**वय** : ५५ वर्ष, **व्यवसाय : शेती,**

**निवासस्थान** : केळी सांगवी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर,

**<u>सरतपासणी सरकारपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. रिके यांचे मार्फत –</u>**

०१. दिनांक ०८.०१.२०२० रोजी मी ज्योती स्टकचर देवली येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी रात्री ११:०० ते सकाळी ७:०० अशी माझी कामाची वेळ होती. त्या रात्री कंपनीमधील नटबोल्टच्या दोन ते तीन गोण्या चोरीला गेल्या होत्या. त्यामुळे १०.०१.२०२० रोजी मी घोटी पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द चोरीची फिर्याद दिली होती. आता मला दाखविलेली फिर्याद ही तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या निशाणी २२ देण्यात येते. मी आरोपींना पाहिले नव्हते, तसेच सदर चोरीला गेलेल्या गोण्या कंपनीला परत मिळाल्या होत्या.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. लहाणे यांच्यामार्फत</u> –**

०२. सदर फिर्याद दाखल करण्याकरिता मला कपंनीतर्फे कोणताही लेखी आदेश मिळाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी कपंनीमध्ये साहेबांच्या तोंडी आदेशा नुसार फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर कंपनीमध्ये कामाला नव्हतो व कंपनीच्या मालकाच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८.०१.२०२० रोजी चोरीची कोणतीही घटना

घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/—

**( मो.द. ननवरे)**

**दिनांक :—** २५/०८/२०२५. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, इगतपुरी
**ठिकाण :—** इगतपुरी